महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक - रविंद्र घोडविंदे ■ कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)
शुक्रवार ■ १५ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०५५

## प्रत्येक जिल्ह्यात 'अपना भांडार'
### पणन मंत्री जयकुमार रावल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**मुंबई :** राज्यात महाराष्ट्र सहकारी ग्राहक महासंघाच्या माध्यमातून शेतकरी आणि ग्राहक या दोन्ही घटकांचा लाभ व्हावा, या उद्देशाने 'अपना भांडार' या नावाने बहुउद्देशीय ग्राहक भांडारे चालवली जातात. भविष्यात सर्व जिल्ह्यांमध्ये अशी भांडारे उभारून खरेदी - विक्रीची साखळी उभारण्यात येईल, असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी जाहीर केले.

महाराष्ट्र सहकारी ग्राहक महासंघाच्या कामकाजाचा मंत्री रावल यांनी मुंबईतील महासंघाच्या कार्यालयात आढावा घेतला. या वेळी महासंघाच्या प्राधिकृत समितीचे अध्यक्ष विठ्ठलराव भोसले, कार्यकारी संचालक विकास रसाळ, महासंघाचे संचालक जयसिंग गिरासे, संचालक गोकुळ परदेशी यांच्यासह संबंधित पदाधिकारी आणि अधिकारी उपस्थित होते. महासंघाच्या मालकीच्या जागांचा पुनर्विकास करुन त्या सुस्थितीत करुन घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे जेथे भाडेतत्वावर जागा आहेत, त्यांची मालकी मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत. जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती, बचत गटांसाठी उभारले जाणारे मॉल्स आदी ठिकाणी 'अपना भांडार' सुरू करण्यात यावेत तसेच या ठिकाणी महिला बचत गटांच्या उत्पादनांना सहभागी करुन घ्यावे. राज्यात ग्राहक महासंघाच्या माध्यमातून खरेदी विक्रीची प्रभावी साखळी तयार करून राज्यात एक बँड निर्माण करावा, अशी सूचनाही त्यांनी केली.

**ग्राहक भांडारांचा सप्टेंबरमध्ये मेळावा**

राज्यातील ग्राहक भांडारांना ऊर्जितावस्था मिळावी, ज्या संस्था उत्कृष्ट काम करीत आहेत, त्यांचे काम इतरांना प्रेरणादायी ठरावे, या उद्देशाने सर्व ग्राहक भांडारांचा मेळावा सप्टेंबर महिन्यात नाशिक येथे आयोजित करण्यात यावा, असे निर्देश पणन मंत्र्यांनी महासंघाला दिले. यामध्ये इतर राज्यांमध्ये चांगले काम करणाऱ्या संस्थांचे, इ कॉमर्स जाणणाऱ्या व्यक्ती, संस्थांचे, आधुनिक तंत्रज्ञानाचे सहकार्य घ्या, अशी सूचनाही त्यांनी केली.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते
## आज नूतनीकृत गडकरी रंगायतनाचे लोकार्पण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** ठाणे शहराचा सांस्कृतिक मानबिंदू असलेल्या राम गणेश गडकरी रंगायतन नाट्यगृहाच्या नुतनीकृत वास्तूचा भव्य लोकार्पण सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ रंगकर्मी सुहास जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वातंत्र्यदिनी, शुक्रवार, १५ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. या अविस्मरणीय सोहळ्यासाठी वनमंत्री गणेश नाईक, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड, आमदार संजय केळकर, आमदार राजेश मोरे, आमदार ॲड. निरंजन डावखरे उपस्थित राहणार आहेत. तसेच, या निमित्ताने, लोकसंगीतावर आधारित युवा कलाकारांचा 'फोकलोक' हा कार्यक्रम होणार आहे. विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना राम गणेश गडकरी रंगायतन या वास्तूच्या नुतनीकरणासाठी राज्य शासनाकडून ३१ कोटी रुपये उपलब्ध करून दिले होते. या निधीतून, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली, रंगायतनच्या जुन्या झालेल्या वास्तूला बळकटी देऊन सर्व यंत्रणांचे नुतनीकरण करण्यात आले आहे. सन १९७८मध्ये बांधण्यात आलेल्या रंगायतनची १९९८मध्ये प्रथम मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती करण्यात आली होती. त्यानंतर आता २६ वर्षांनी नुतनीकरण करण्यात आले आहे. ऑक्टोबर-२०२४ मध्ये नुतनीकरणाचे काम सुरू करण्यात आले. हे काम सुरू करताना आणि कामाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर रंगभूमीवर कार्यरत असलेले कलाकार, दिग्दर्शक, निर्माते यांच्याशी महापालिकेने सविस्तर चर्चा व प्रत्यक्ष पाहणीही केली. त्यानुसार, गडकरी रंगायतनचे संपूर्ण रुप पालटून टाकण्यात आले आहे.



*जावक क्रमांक : ठामपा/पिआरओ/जाहिरात /५३०/२०२५-२६ दिनांक: १४/०८/२०२५



*जावक क्रमांक : ठामपा/पिआरओ/जाहिरात /५२९/२०२५-२६ दिनांक: १४/०८/२०२५

### केडीएमसीच्या ‘ड’ प्रभागात

# अनोख्या स्वरुपात तिरंग्यास अभिवादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : 79 व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधुन तसेच हर घर तिरंगा म्हणजेच घरोघरी तिरंगा या अभियाना अंतर्गत कल्याण डोंबिवली महापालिकेमार्फत अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून गुरुवारी सकाळी महापालिकेच्या "ड" प्रभागात सहा. आयुक्त उमेश यमगर आणि त्यांच्या पथकाने तीन वेगवेगळे उपक्रम राबवत तिरंग्यास अनोखे अभिवादन केले आहे. या उपक्रमात आमदार सुलभा गायकवाड, महापालिका आयुक्त अभिनव गोयल, उप आयुक्त संजय जाधव यांच्या सह अनेक मान्यवर, नागरिक तसेच असंख्य विद्यार्थी सहभागी झाले होते.

या उपक्रमाच्या अनुषंगाने "ड" प्रभाग क्षेत्र परिसरातील स्व. बाळासाहेब ठाकरे उद्यान तसेच वेस्टर्न रिजन स्कुल परिसर येथे आमदार सुलभा गायकवाड, महापालिका आयुक्त अभिनव गोयल, उप आयुक्त संजय जाधव यांच्या उपस्थितीत विविध देशी प्रजातींच्या सुमारे 1000 वृक्षांची लागवड करण्यात आली. तद्नंतर शेकडो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत जिरेटोप चौक, चिंचपाडा रस्ता, काटेमानिवली चौकापासून "ड" प्रभाग कार्यालया पर्यंत "हर घर तिरंगा" प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीत शालेय विद्यार्थ्यांनी 100 फुटी ध्वजा समवेत सहभाग घेतला. यावेळी मॉडेल कॉलेज, साकेत कॉलेज, कमलादेवी कॉलेज तसेच सहयोग सामाजिक संस्था, जाणिव सामाजिक संस्था यांचे सह इतर अनेक संस्थांचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

हर घर तिरंगाच्या अनुषंगाने "ड" प्रभाग कार्यालयाने द्वारका विद्यामंदिरामधील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने युनेस्कोच्यायादीत अंतर्भाव झालेल्या शिवारायांच्या 12 किल्ल्यांची हुबेहुब प्रतिकृती साकारली. या प्रतिकृतींची देखील उपस्थित मान्यवरांनी प्रशंसा केली. त्याचप्रमाणे हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत "ड" प्रभाग क्षेत्र परिसरात "हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता" हे अनोखे जनजागृतीपर अभियानही राबविण्यात आले. यामध्ये सुमित एल्कोप्लास्टच्या टिमने अतिशय परिणामकारकरित्या स्वच्छतेसोबतच ओला आणि सुका कचरा वर्गीकरणाचे महत्त्व आपल्या पथनाट्याच्या माध्यमातुन उपस्थितांना पटवून दिली.

आमदार सुलभा गायकवाड यांनी या पथनाट्याचे कौतुक करत नागरिकांनी देखील कचरा वर्गीकरण करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. नागरिकांनी केवळ उदयाच्या स्वातंत्र्य दिनासाठी नव्हे तर यापुढेही नेहमीच आपल्या मनामध्ये देशभक्तीची भावना जागृत ठेवावी असे आवाहन करीत आयुक्त अभिनव गोयल यांनी उपस्थितांना तसेच सर्व नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या..



### ‘घरोघरी तिरंगा’ उपक्रमातंर्गत

# ठाणे महापालिकेचे विविध उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : 79 व्या स्वातंत्र्यादिनानिमित घरोघरी तिरंगा या उपक्रमातंर्गत ठाणे महापालिकेच्या माध्यमातून देशभक्तीपर गीते, नृत्य आणि सायकल रॅली अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन ठाणे महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमास शालेय विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमास माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर , प्र.उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर यांच्यासह माहिती व जनसंपर्क विभाग, क्रीडा विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. सकाळी 6.30 वा. ठाण्यातील सायकल महापौर चिराग शहा यांच्यामार्फत ठाणे महापालिका भवन ते राम गणेश गडकरी रंगायतन अशी सायकल रॅली तिरंगा घेवून काढण्यात आली होती. या रॅलीत मोठ्या प्रमाणावर सायकलस्वार सहभागी झाले होते. हातात तिरंगा घेवून वंदे मातरम् च्या घोषणा देत ही रॅली निघाली.

यावेळी ठाणे महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गाणी व नृत्य सादर केले. यावेळी मीनताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेच्या लिनता मुणगेकर, संगीता धुरी, शीतल जाधव, कांचन नाईक, अश्विनी गवस आदींनी देशभक्तीपर समूहगान सादर केले. तर राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या सिद्धी मालीवाल, साहिल देसाई यांनी देशभक्तीपर गीते, तर शाळा क्र. 29 च्या विद्यार्थीनी मोहिनी जयस्वाल, मीना चौधरी, आचल प्रजापती, पौर्णिमा अंभोरे, आशा राठोड जिद्द शाळेचे कर्मचारी सपना वेलींगकर, डॉ. भाग्यश्री तांबे, डॉ. संगीता बोरसे यांनी यांनी तेरी मिटी मे मिल जावा या गाण्यावर नृत्य सादर केले. तर शाळा क्र. 18 व शाळा क्र. 42 च्या विद्यार्थ्यांनी देखील नृत्य सादर केले. यावेळी सर्वांना तिरंगा ध्वजाच्या सन्मानाची शपथ घेतली.

### ‘हर मन तिरंगा हर घर तिरंगा’ अंतर्गत

# भिवंडी मनपाची हरित शपथ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




भिवंडी : पर्यावरणाच्या दृष्टीने शासन धोरणानुसार मान्सून काळात २०२५ - २६ मध्ये जास्तीत जास्त झाडे लावणे धोरणानुसार १५ ऑगस्ट २०२५ दिनाचे औचित्य साधुन "हर मन तिरंगा हर घर तिरंगा " अंतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या उद्यान / वृक्षप्राधिकरण विभागामार्फत महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ कार्यक्षेत्र अंतर्गत खालिद अमिन कॉम्पलेक्स अबुजी मॅरेज हॉलच्या बाजुला, आमपाडा येथील नव्याने तयार करण्यात येणाऱ्या क्रिडासंकुलच्या आवारामध्ये दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी "हर मन तिरंगा हर घर तिरंगा " अंतर्गत वृक्षरोपणांचे महत्व व पर्यावरणाचे समतोल राखणेकामी हरित शपथ घेण्यात आली. तसेच सदरहू क्रिडासंकुलच्या आवारामध्ये स्थानिक १५ व बसंत रानी १५ अशा प्रजातीच्या झाडांची वृक्षरोपण करण्यात आलेले प्रजातीची कदंब असून, त्यांचे जतन व संवर्धन करण्यात येणार आहे. सदरहू वृक्षरोपणांच्या कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. निलेश ना. संखे, वृक्षअधिकारी तथा मुख्य उद्यान अधिक्षक, स्थानिक जेष्ठ नागरीक, उद्यान विभाग व पर्यावरण विभागाचे कर्मचारी वर्ग यांच्या उपस्थितीत मा. निलेश नारायण संखे, वृक्षअधिकारी तथा मुख्य उद्यान अधिक्षक यांच्या शुभहस्ते वृक्षरोपणांचा कार्यक्रम करण्यात आले असून, त्यांचे जतन व संवर्धन करण्यात येणार आहे.

# ठाणे जिल्हा परिषदेत तिरंगा सन्मान शपथ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता






ठाणे : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत दि. ०२ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत आज, दि. १४ ऑगस्ट रोजी तिरंगा सन्मान शपथ कार्यक्रम मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

या वेळी रोहन घुगे म्हणाले, “तिरंगा हा आपल्या स्वातंत्र्याचा, अभिमानाचा आणि एकतेचा प्रतीक आहे. प्रत्येक घरावर तिरंगा फडकवणे म्हणजे आपल्या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहणे आणि भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकजुटीची शपथ घेणे होय. जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने या अभियानात सहभागी व्हावे. तिरंगा फडकवण्याबाबत शासनाने दिलेल्या नियमाचे पालन देखील जबाबदार नागरिक म्हणून करावे.”

शपथविधी दरम्यान अधिकारी व कर्मचारी यांनी — “मी आपला तिरंगा ध्वज फडकवेन, स्वातंत्र्यसैनिक व वीर हुतात्मे यांच्या बलिदानाचा सन्मान करेन आणि भारताच्या विकास व प्रगतीसाठी स्वतःला समर्पित करेन” अशी शपथ घेतली.

कार्यक्रमाला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, समाज कल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. स्वाती पाटील, डॉ. किर्ती डोईफोडे यांसह सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्ह्यातील सर्व ग्रामस्थ, शाळा, संस्था व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, ‘हर घर तिरंगा’ या राष्ट्रीय अभियानात सहभागी होऊन तिरंग्याचा मान वाढवावा आणि स्वातंत्र्यदिनाचा आनंद उत्साहात साजरा करावा.

### भारताच्या ७९ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे ध्वजारोहण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : भारताच्या 79 वा स्वातंत्र्य दिनानिमित्त शुक्रवार, दि.15 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 09.05 वाजता उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ संभाजी शिंदे यांच्या हस्ते ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

मुख्य समारंभानंतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या अधिकारी/व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते जिल्हा नियोजन समिती सभागृहात गौरव होणार आहे.

या समारंभास जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिक, आणीबाणी सत्याग्रही, माजी सैनिक, ज्येष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी, प्रसारमाध्यम प्रतिनिधी यांनी जरूर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### ‘हर घर तिरंगा’ उपक्रमांतर्गत

# पाली आश्रमशाळेचा वैविध्यपूर्ण उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता






वाडा : शासनाच्या हर घर तिरंगा उपक्रम अंतर्गत शासकीय माध्यमिक व उच्चमाध्यमिक आश्रमशाळा पाली येथे २ ऑगस्ट पासून 3 टप्प्यात विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

पहिल्या टप्प्यात तिरंगा प्रेरित कलाकृतीनि शाळेच्या भिंती व फलक सजवणे, शाळांमध्ये तिरंगा रांगोळी स्पर्धा आयोजित करणे.

दुसऱ्या टप्प्यात तिरंगा यात्रा व रॅली काढून विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात आले.

तिसऱ्या टप्प्यात शाळेमध्ये ध्वजारोहण समारंभ, सेल्फी वुइथ तिरंगा, प्रभात फेरी, वृक्षारोपण, पसायदान गायन, पालघर जिल्हा हुतात्मा दिन व देशाची फाळणी दुःखद दिवस साजरा करण्यात आला. उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक डी. पी. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागातून विनोद पाटील, गणेश गोंटलेवार, उर्मिला पाटील, अमोल गायकवाड, वृक्षारोपण समितीचे मोहन गोतारणे, संजय जाधव, हितेश्री घरत आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# आपले स्वातंत्र्य, आपली जबाबदारी



लेखक
शारदासुत सुनील म्हसकर
वासिंद- पाली

मातीच्या मुक्तीसाठी हृदयात पेटला ध्यास
मानिली फुलांची माळा तो गळ्याभोवती फास
ते फकीर देशासाठी हातात घेतली झोळी
“जय भारतमाता” म्हणता छातीत शिरली गोळी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. ब्रिटिशांचा युनियन जॅक खाली उतरवून भारताचा तिरंगा ध्वज डौलाने फडकवला आणि इंग्रजांच्या दास्य श्रृंखलेतून भारतीय जनता मुक्त झाली. ब्रिटिशांची गुलामी नष्ट झाली. भारत स्वतंत्र झाला. मागील तीन वर्षांपूर्वीच आपण आपल्या भारतीय स्वातंत्र्याचा 'अमृतमहोत्सवी सोहळा' 'याची देही, याची डोळा' अनुभवला.

आज १५ ऑगस्ट, २०२५ अर्थातच, आपल्या भारताचा स्वातंत्र्य दिन !

‘आजी सोनियाचा दिनु, वर्ष अमृताचा धनु’ याप्रमाणे आज आपल्या सर्वांसाठी सोन्याचा दिवस आहे. आपल्या भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या या तेजोमय शौर्यगाथेस ७८ वर्षे पूर्ण होऊन आज आपण ७९ व्या वर्षात पदार्पण करत आहोत, ही आपणा सर्वांसाठी भाग्याची व अभिमानाची गोष्ट आहे. म्हणूनच आज आपल्या सर्वांच्या मनाची ‘आनंदाचे डोही आनंद तरंग’ अशी आनंदमयी अवस्था झाली आहे. पण माझ्या बंधू भगिनींनो, हे स्वर्गीय सुख देणारे स्वातंत्र्याचे दिवस आपल्याला सहजासहजी मिळाले आहेत का? तर अजिबात नाही. त्यासाठी आपल्या भारतीयांना अनेक लढे द्यावे लागले, चळवळी उभाराव्या लागल्या. आपल्या निधड्या छाताडावर इंग्रजांच्या गोळ्या झेलाव्या लागल्या. आपल्या कुटुंबावर तुळशीपत्र ठेवावे लागले. इतकेच नव्हे तर असंख्य भारतीय नरवीर, क्रांतिवीर व शूरवीर यांनी आपल्या प्राण्यांच्या आहुत्या समर्पित करून हौतात्मे पत्करले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झपाटलेल्या व आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या या सर्वांच्या संघर्षातून आणि बलिदानातून १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. सर्व भारतीय शूरवीर, नरवीर व महान क्रांतिवीरांनी

दिव्य तेज अंतरी आमुच्या अंधाराचे भय न कुणा
आसमंत व्यापून निनादे राष्ट्रगर्जना पुन्हा पुन्हा

अशी हाक देऊन व ‘वंदे मातरम’ हा जयघोष करत सर्वसामान्य जनतेची अस्मिता जागृत केली. आपल्या प्रभावी वाणीने व निर्भय अशा कृतींनी मातीच्या थंड गोळ्याप्रमाणे अन्याय-अत्याचाराच्या घोर अंधारात खितपत पडलेल्या भारतीय मृत समाजास नवसंजीवनी देऊ केली. सर्व भारतीयांमध्ये स्वातंत्र्याची जाणीव निर्माण केली. त्यातूनच प्रेरणा घेऊन भारतीयांनी कृतनिश्चयाने उभे राहून आणि

अपनी आजादी को हम हरगिज
मिटा सकते नहीं
सर कटा सकते है लेकिन
सर झुका सकते नहीं

असा मनात दृढ संकल्प करून जुलमी इंग्रजी सत्तेशी निकराने लढा देत भारतीयांनी आपले स्वातंत्र्य सिद्ध केले. भारताला स्वातंत्र्य व सार्वभौमत्व मिळाले आणि त्यामुळेच आज आपण

अजिंक्य भारत अजिंक्य जनता ललकारत सारे
ध्वज विजयाचा उंच धरा रे उंच धरा रे उंच धरा रे

असे सारे एकत्र येऊन अभिमानाने गौरव गान गात असतो. आपल्या महापुरुषांनी वेळीच जीवाची बाजी लावून निस्वार्थी भावनेने भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले आहे. आज त्या आपल्या महापुरुषांचे स्मरण करणे आपले कर्तव्य आहे. ज्या उद्दिष्टांसाठी या सर्व महान विभूतींनी इंग्रजांशी आयुष्यभर लढा दिला त्या उद्दिष्टांची पूर्ती करण्याची शपथ आपण घेतली पाहिजे. आपल्या समृद्ध व समर्थ भारताचे स्वप्न त्यांनी पाहिले व जोपासले होते तसेच त्यासाठी जो संकल्प केला होता त्याची पूर्तता करण्यासाठी आपण प्रत्येकाने आपली जबाबदारी व आपली कर्तव्य निष्ठेने व प्रामाणिकपणे पूर्ण केली पाहिजेत. दीनदुबळ्यांच्या, वंचितांच्या उत्थानासाठी मदतीचा हात पुढे केला पाहिजे.

विश्वकवी रवींद्रनाथ टागोर यांनी या स्वातंत्र्याकडून आकांक्षा केली आहे की, “केवळ परकीयांच्या दास्य श्रृंखलेतून मुक्त होण्याइतके आपले स्वातंत्र्य मर्यादित नाही. जिथे चित्त निर्भय आहे आणि शीर उन्नत आहे, जिथे ज्ञान स्वतंत्र आहे, जिथे शब्दांचा उगम सत्यातून होतो, जिथे विचार आणि कार्य यात प्रगती करण्यासाठी ईश्वराकडून मन प्रेरित होते, अशा स्वातंत्र्य स्वर्गात माझा देश जागृत होत राहो,” ही गुरु रवींद्रनाथांची आकांक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी आपली आहे. भारतीय ऋषीमुनींनी ज्या मुक्तीची कास धरली होती, त्या दिव्य कल्पनेला स्पर्श करणारे असे हे ‘स्वातंत्र्य’ आहे. आपला ‘राष्ट्रध्वज’ हा त्या आदर्शांचे आपल्याला नित्य आवाहन करत आहे, स्मरण करत आहे. ‘राष्ट्रगीत’ हा या मुक्कामावर पोहोचण्यासाठी दिलेला महामंत्र व स्मृतिमंत्र आहे. ‘राज्यघटना’ ही आपल्या आर्थिक सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याचे द्योतक आहे. ‘स्वातंत्र्य’ हा आपला राष्ट्रीय आदर्श आहे. ह्या अशा आदर्श स्वातंत्र्यापर्यंत आपल्याला आपल्या पुरुषार्थाने, पराक्रम व त्यागाने पोहोचायचे आहे.

स्वामी विवेकानंद म्हणतात, “स्वदेशासाठी सर्वस्व अर्पण करणारे आणि पूर्णपणे निष्कपट असे लोक जेव्हा तुमच्यामध्ये निपजतील तेव्हा हिंदुस्थान सर्वदृष्टीने महान होईल. उत्तम माणसांनी तर देश महान बनत असतो.” हे स्वामींचे विचार आज आपण लक्षात घेऊन पुढे वाटचाल करणे, ही आजच्या काळाची गरज आहे.

केवळ परकीयांच्या गुलामगिरीतून मुक्त होणे म्हणजे स्वातंत्र्य नसून आपण वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय पातळीवर आपल्या विचार, वर्तणूक, व्यवहार व उपजीविका, श्रद्धा व अभिव्यक्ती यामध्ये स्वतंत्रता मिळविणे म्हणजे खरे स्वातंत्र्य होय. आपले स्वातंत्र्य त्याग, समर्पण, संघर्ष व त्यासाठी बलिदान दिलेल्या असंख्य नरवीरांच्या कष्टाचे फळ आहे.

झाशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, मंगल पांडे, वासुदेव बळवंत फडके, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, अरुणा असफ अली, सरोजिनी नायडू, प्रीतिलता वड्डेदार, भिकाजी कामा, कमलादेवी चट्टोपाध्याय, कस्तुरबा गांधी अशा अनेक महान विभूतींनी आपले प्राण पणाला लावले. त्यामुळे असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या रक्ताने व बलिदानाने मिळालेलं हे स्वातंत्र्य फक्त आपली जहागिरी नाही, तर नैतिक व सामाजिक जबाबदारीचं ओझंही आहे.

आपल्या पूर्वजांनी आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले आहे. पण, आता ते टिकवून ठेवणे ही आजची खरी लढाई आहे. यासाठी आपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की, ‘स्वातंत्र्याशिवाय जबाबदारी नसते आणि जबाबदारीशिवाय स्वातंत्र्य नसते. जर आपण आपली जबाबदारी पार पाडली नाही, तर आपले स्वातंत्र्य टिकवणे आपल्याला कठीण होईल.’ आज आपण पाहतो की, बऱ्याच ठिकाणी स्वातंत्र्या ऐवजी स्वैराचार चाललेला आहे. याकरिता आपण मनात कोरले पाहिजे की, ‘स्वातंत्र्य म्हणजे अमर्याद स्वैराचार नसून संविधानाने ठरवून दिलेल्या नियमांच्या चौकटीत राहून स्वतःबरोबर आपल्या देशाला घडवणे होय.’ भारतीय संविधानाने कलम ५१ अ यानुसार आपल्याला मूलभूत कर्तव्ये सांगितली आहेत ती आपण आचरणात आणली पाहिजेत. तसेच संविधान, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा सन्मान व आदर करणे; देशाचे ऐक्य, अखंडता व सार्वभौमत्व राखणे, स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण व त्यांच्या बलिदानाचा आदर करणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसा न करणे; पर्यावरण, वन्यजीव व नद्या यांचे संरक्षण करणे; शासनाने घालून दिलेले कायदे व नियम प्रामाणिकपणे पाळणे, राष्ट्रीय संपत्तीचे संवर्धन व संरक्षण करणे; आपले घर, आपले गाव-शहर स्वच्छ व सुंदर ठेवणे, एकता-बंधुता व समतेने इतरांशी वागणे, इतरांच्या मताचा आदर करणे, शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे, भ्रष्टाचाराचे निर्मूलन करणे तसेच समाजाच्या व देशाच्या विकासासाठी वेळीच सक्रिय सहभाग घेऊन सदैव प्रयत्नशील असणे, मतदानाचा हक्क बजावणे इत्यादी जबाबदाऱ्या व कर्तव्ये देशाच्या विकासासाठी आपण पार पाडल्या पाहिजेत. विशेषकरून युवापिढीने हे अधिक लक्षात घेऊन युवकांनीही चारित्र्यसंपन्न व विविध कौशल्यांनी निपुण होऊन राष्ट्रनिर्मिती, समाजकल्याण, पर्यावरण रक्षण, संशोधन व नवोन्मेष, स्वयंरोजगार यामध्ये योगदान दिले पाहिजे.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येक भारतीयाने आपले अधिकार जपतानाच आपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडणे ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. एक जबाबदार व्यक्तीच राष्ट्राच्या विकासात मोलाचे योगदान देऊ शकते. स्वतंत्र भारत, सजग व सुजाण नागरिक हीच खऱ्या उन्नत राष्ट्राची शक्ती असून आपले कर्तव्यच आपले स्वातंत्र्य जपत असते. स्वातंत्र्य दिन हा फक्त राष्ट्रीय सण नसून आपण आपल्या देशासाठी चांगले काय काय करू शकतो या जाणीव-जागृतीचा उत्सव आहे!

स्वातंत्र्यसूर्य निरंतर आढळ राहण्यासाठी आपण प्रतिज्ञा केली पाहिजे की,

इक दौर नया दुनिया में शुरू हम सबके कदम से होगा
बदनाम हो जिससे देश अपना वह काम न हमसे होगा

We always say, “ I am proud of my country. I think, it is not enough. Everyone should think that, “ Is my motherland proud of me?”

अशाप्रकारे जेव्हा आपल्या प्रत्येकाचा अभिमान आपल्या देशाला होईल आणि ‘आपला देश, आपले स्वातंत्र्य व आपली जबाबदारी’ हा विचार जेव्हा आपल्या लक्षात येऊन तो विचार आपल्या कृतीत उतरेल तेव्हाच आपण गौरव व अभिमानाने म्हणू शकू...

“सारे जहाँसे अच्छा हिंदुस्तान हमारा”!

पुन्हा एकदा आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राण्यांची आहुती देणाऱ्या क्रांतिवीर नरवीर व महात्म्यांना माझे कोटी कोटी प्रणाम!

शेवटी अभिमानाने म्हणू या की,

मौत रुक नहीं सकती वक्त मुकर्रर हो जाने से
शान घट नहीं सकती वतन पर मिट जाने से !!

धन्यवाद. जय हिंद, जय भारत, जय जगत!



## भारत निर्धार..

स्वतंत्र प्रगत भारत
पक्कात्याचा निर्धार
आत्मनिर्भर भक्कम
आश्रिता देई आधार

शहिदांचा आशिर्वाद
बरसत नीतधुवांधार
स्वातंत्रता अर्थ कळे
स्वराज्यार्थ संप्रधार

परिपक्व न्अनुभवी
विचारा प्रगल्भ धार
ठेवणार नाही बाकी
चुकवून टाकी उधार

हल्लेखोरां सडेतोड
बुमरँग प्रत्येक प्रहार
करे निर्भयते पर्यटन
कुठेही मुक्ततेविहार

सत्पुरुषां मानवंदना
सादर करतो जोहार
आदर सर्वधर्मियांचा
एकत्रसर्वांचे त्योहार

हरेकजागी आघाडी
सुयश घालतेयं हार
शस्त्रप्राविण्यअद्भुत
प्रतिस्पर्धी माने हार

विश्वगुरु होवो भारत
आता आपणा मदार
स्वप्न आणू प्रत्यक्षात
उत्सव बने असरदार

- हेमंत मुसरीफ पुणे .
9730306996.

# कल्याण-टिटवाळा रस्त्याची दुरावस्था



## खड्ड्यांचे ग्रहण संपणार कधी?

### नागरिकांचा सवाल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपाच्या अ प्रभागातील मोहने आंबिवली स्टेशन बल्याणी मार्गे टिटवाळाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील खड्डे पाहता रस्त्यात खड्डे कि खड्डे युक्त रस्ता अशी अवस्था असून यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्याचा जीव टांगणीला लागल्याचे यानिमित्ताने दिसत आहे.

केडीएमसीच्या ग्रामीण अ प्रभाग क्षेत्रातील मोहने टिटवाळा रस्त्यावर पडलेले खड्डे पाहता रस्त्याची दुरावस्था झाली आहे. मोहने, अंबिवली स्टेशन मार्गे बल्याणी, टिटवाळा या रस्त्याची झालेली वाताहत पाहता या रस्त्यावरून वाहन चालकांना तारेवरची कसरत करत खड्डे चुकवावे लागत आहेत. तर आप्तकालीन परिस्थितीत रायते पुल बंद झाल्यास कल्याण नगर वाहतूक देखील पर्यायी रस्ता म्हणून या रस्त्यावरून होते. कल्याण टिटवाळा या रस्त्यावर नेहमीच वाहनांची वर्दळ असते. वाहतूकीच्या, प्रवाशांच्या सोयीच्या या रस्त्याची खड्डे पडल्याने वाताहात झाली आहे. तरी प्रशासनाचे दुर्लक्ष का असा सवाल करदाते नागरिक या निमित्ताने करीत आहेत.

बल्याणी प्रभागाचे माजीनगरसेवक मयूर पाटील यांनी संदर्भीत रस्त्याचे खड्डे बुजविण्यासाठी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला असून अद्याप देखील कामाला गती मिळत नसल्याचे दिसत आहे. या रस्त्यावर संभाव्य अपघात घडल्यास कोणाचा जीव गेला तर जबाबदार कोण असा सवाल यानिमित्ताने उभा ठाकला आहे. नुकतेच मोहने टिटवाळा रस्ता दुरावस्था संदर्भात कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी प्रशासनाला धारेवर धरीत रस्त्यातील खड्डे बुजविण्याबाबत सांगितले. अन्यथा शिवसेना स्टाईल ने जबाब दिला जाईल असा इशारा दिला होता. अवघ्या दहा ते बारा दिवसावर गणेशोत्सव येऊन ठेपला आहे, त्यामुळे बाप्पा चे आगमन, होणार असल्याने तातडीने संदर्भीत रस्त्याचे खड्डे भरून रस्ता सुस्थितीत करावा अशी मागणी यानिमित्ताने जोर धरू पाहत आहे.

"मोहने बल्याणी टिटवाळा रस्ता खड्डे भरण्याचे काम सुरु असून, या रस्तावर ज्या ठिकाणी जास्त मोठे खड्डे पडले आहेत. त्या ठिकाणी पेव्हर बसवून रस्ता दुरूस्तीचे काम करीत असल्याचे उप अभियंता हरूण इनामदार यांनी सांगितले."

## भिवंडीत समाजवादी पक्षाचे संविधान बचाओ आंदोलन

### संविधान समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाचा अधिकार देते - रियाझ आझमी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी समाजवादी पक्षाचे नेते प्रदेश सचिव रियाज आझमी यांच्या नेतृत्वाखाली आज उपविभागीय कार्यालयाबाहेर सविधान बचाओ धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले होते. पदाधिकाऱ्यांसह शेकडो नागरिकांनी या धरणे आंदोलनात सहभागी होत भाजपा सरकार कारभाराचा निषेध व्यक्त केला.

निवडणूक आयोग भाजपचे बटिक होऊन काम करीत आहे.त्यामुळे लोकशाही धोक्यात आली आहे. संविधानाचे रक्षण करून लोकशाही वाचविण्याची गरज आहे.लोकशाहीत सर्वसामान्यांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतल्यास ती लोकशाहीची हत्या ठरेल असे मत सपाचे प्रदेश सचिव रियाज आजमी यांनी यावेळी व्यक्त केले. मतदारांची नांवे वगळून मत चोरी करण्याचा प्रकार भाजपा सरकार करीत आहे.संविधान आपल्याला समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाचा अधिकार देते, परंतु जेव्हा निवडणुकीत मतांची चोरी होते तेव्हा हा अधिकार थेट हिरावून घेतला जातो. अशा वेळी रस्त्यावर उतरून आवाज उठवणे हीच लोकशाहीची खरी सेवा आहे." त्यांनी कामगारांना लोकांना जागरूक करण्याचे आणि हे आंदोलन प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचे आझमी यांनी या वेळी आवाहन केले. "मत चोरी थांबवा" आणि "संविधान वाचवा - लोकशाही वाचवा" अशा घोषणां यावेळी देण्यात आल्या, मत चोरीच्या घटनांची न्यायालयीन चौकशी करण्याची, निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता वाढवण्याची आणि संविधानाच्या मूळ भावनेचे रक्षण करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची मागणी करण्यात यावेळी आझमी यांनी केली.या आंदोलनात पक्षाचे जेष्ठ कार्यकर्ते मुनव्वर शेख, रियाज शेख, फारुख आझमी, सुग्गी देवी, माजी नगरसेवक हसीब खान, अरविंद यादव, आलमगीर शेख, अफाक फारुकी, हमीद शेख, डॉ. शमीम यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक सहभागी झाले होते. लोकशाही हक्कांचे रक्षण करण्यासाठी संघर्ष सुरू ठेवण्याची प्रतिज्ञा यावेळी करण्यात आली. जोपर्यंत निवडणूक आयोग यामध्ये सुधारणा करीत नाही तोपर्यंत आम्ही रस्त्यावरची लढाई लढत राहणार असा इशारा रियाज आजमी यांनी दिला. सायंकाळी पक्षाच्यावतीने रियाज आजमी व शिष्टमंडळाने भिवंडी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन सुपूर्द केले.




# कृष्णलीलेची वास्तविकता



कंस......कृष्णाचा कर्दनकाळ.प्रत्यक्ष त्याचा सख्खा मामा.पण त्याने आपल्या सख्ख्या सहा भागिनेयला का मारले असावे ही विचार करणारी बाब आहे.तशी रक्तरंजितही.मुळात राक्षसी वृत्तीचा असलेला कंस.आपल्या बहिणीने वासुदेवाशी प्रेमाने विवाह केलेल्या बहिणीचा विवाहरथ हाकत असतांना आकाशवाणी झाली,"हे कंसा,तु कोणाचा रथ हाकतोय.जिच्या पोटचा आठवा गर्भ तुझाच वध करणार आहे." सगळा डाव......राक्षसी वृत्तीच्या कंसाला संपविण्याचा.राक्षसी वृत्ती नष्ट करण्याचा डाव नाही तर माणूसच संपविण्याचा डाव.आपण आठवा मुलगा मारू.त्या आठव्या मुलाच्या वधासाठी एवढे भागिनेय का मारावे?कंसाचा त्यावर विचार.त्यातच पुन्हा भविष्यवाणी "कदाचित देवकीच्या आठव्या मुलाने पहिल्या पोराच्या वेळीच जन्म घेतला तर...." त्यातच देवकीचा आठवा पुत्र पहिल्याच मुलांच्या वेळी त्याचा जन्म झाला तर......कंसाच्या मनात सारखा विचार येत होता.कोणाला मृत्यूचे भय नाही.ते भय कंसालाही होते.यातूनच राग येवून कंसाने बहिण देवकी व वासूदेवाला कैदेत टाकले.साधी कैद नाही तर नजरकैद.मग कंस आपली बहिण गरोदर असल्याचे समजताच तिची देखभाल करायचा नव्हे तर पहारेक-यांमार्फत बारीक लक्ष ठेवायचा.जेव्हा बाळ जन्मायचं,तेव्हा त्याला नवीन कपडे घालून ठार करायचा.असे सहा पुत्र देवकीचे,देवकीच्या डोळ्यासमोर कंसाने ठार केले.मात्र कृष्ण व बलरामाला तो ठार करु शकला नाही.कंसाला जेव्हा माहीत झालं की आपल्या बहिणीचा सातवा व आठवा गर्भ जीवंत आहे व तो गोकुळात आहे.त्याने त्या बाळाला ठार करण्यासाठी कागेसन,पुतना,बकासूर इत्यादी राक्षसांना पाठवले.पण धिप्पाड शरीराच्या या राक्षसांना कृष्णाने केवळ युक्तीने ठार केले.

अंगूलीवर उचललेला गोवर्धन,कालियामर्दन,तसेच पुतनेचा वध या गोष्टी कृष्णाच्या लीलेला शोभण्यासारख्या असल्याने त्यात चमत्कार दिसतो.पण त्यात चमत्कार होता की नव्हता हे आम्ही वास्तविक जीवनात जगणारी मंडळी सांगू शकत नाही.कोणी तर म्हणतात महाभारत घडलेलंच नाही.ती एक दंतकथा आहे.पण ती जरी दंतकथा असली तरी आजच्या वास्तविक जीवनात या दंतकथेपासून ब-याच गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.आम्ही त्या काळातील या कृष्णलीलांना चमत्काराची जोड दिली असली तरी वास्तविक जीवनात कृष्णजन्म दंतकथा वाटत नाही.

कृष्ण जन्म मुळात रक्तरंजितेने सजलेला आहे. केवळ राक्षसी वृत्तीचा कंस......त्याने आपल्या बहिणीचा रथ हाकलला.पण आकाशवाणीच्या या तडाख्यात कंसाचे जीवन पार बदलून टाकले.कंसवध करणे म्हणजे राक्षसवृत्तीचा अंत करणे,त्याला जसा कृष्ण जीवंत असल्याचं माहीत झालं.तसा तो अधिक संतापत असे व कृष्णाला मारायला राक्षसावर राक्षस पाठवित असे. तरीही कृष्ण वाचल्याने तो अधिकच संतापत असे.

समाजात कोणत्याही गोष्टीचे दोन भाग पडतात. एक चीत भाग व दुसरा पट भाग.चीत अर्थात सत्य आणि पट अर्थात असत्य.जन्म झाल्यानंतर मृत्यू येणारच.तो कितीही थांबवला तरी थांबत नाही.परीवर्तन काळाची गरज आहे.जेव्हा पर्यंत माणूस मरत नाही,तेव्हापर्यंत नवीन जन्म होत नाही. समतोलपणा हा सृष्टीचा नियम.तो तोडून कसा चालेल.इथे जेवढी वाईट माणसं आहेत.तेवढीच चांगलीही माणसं आहेत.कंस दरबारी जरी वाईट वृत्तीची माणसं असली तरी अक्रुरसारखी चांगली माणसंही होती.

कृष्णाची लीला सांगायची झाल्यास कालियाचा दंश वाचवून त्याच्या फणीवरच चढून थयथय नाच करणारा कृष्ण.त्याच्या पायाच्या वज्राने कालियाला शरण आणले.तसेच आपल्यावर जीव लावणा-या रुक्मिणीला कृष्णाने पळवून आणले.ही एक मदतच होती.कारण रुक्मिणीसारख्या नाजूक कन्येला गुंडाच्या तावडीत न सापडू देणे हा कृष्णाचा उद्देश होता.म्हणून वेळप्रसंगी त्याला पळवून आणावं लागलं.तसेच जरासंघाच्या कुटील आक्रमणानं त्रस्त होवून आपल्या राजेरजवाड्याच्या भांडणात जनतेचं नुकसान होवू नये म्हणून कृष्णा ने द्वारकेची निर्मीतीच समुद्रात केली.ही द्वारकेची निर्मीती आजच्या समुद्रावर बांधलेल्या सिंधुदुर्ग व विजयदुर्गसारखीच आहे.एवढंच नाही तर इंद्राचा अहंकार नष्ट करण्यासाठी अंगूलीवर उचललेला गोवर्धन हे ही कृष्ण लीलेचं उत्कृष्ट उदाहरण.एवढंच नाही तर या कृष्णाने शिशुपालाचे शंभर गुन्हे माफ करुन एकशे एक व्या गुन्ह्यात त्याचा वध केला यावरुन वर्तमानात कोणाचेही तेवढेच ऐका,जेव्हापर्यंत सहन होते.जेव्हा सहन होत नाही,तेव्हा प्रतिकार करा हा बोध मिळतो.आधुनिक काळ हा गुंडाचा काळ आहे.जिथे जावे तिथे गुंडेगिरीचा सामना करावा लागतो.

**अंकुश रा.शिंगाडे**
**९३७३३५९४५०**

अशावेळी या गुंडांनाही सबक कसा शिकविता येईल यासाठी ही कृष्णलीला कामी पडते.पण एखाद्याला वाटेल की कृष्णाने अशी कोणती लीला केली शिशुपालाला मारुन.ती तर हिंसा होती.त्याचा आजच्या काळात कोणता उपयोग? महत्वाचं म्हणजे एखाद्या स्रीवर एखादा पुरुष सतत अत्याचार करीत असेल,तर तो अत्याचार तिने शेवटपर्यंत सहन करु नये असा बोध शिशुपालाच्या वधातून मिळतो.मुळात ही कृष्णलीला ताकद, हिंमत, संयम शिकविते हे आपण लक्षात घ्यायला हवे.

मित्रप्रेमाचे उदाहरण द्यायचे झाल्यास सुदाम्याची व कृष्णाची मैत्री वाखाणण्याजोगी आहे.सुदामा गरीब असूनही कृष्णाने त्याला अंतर पडू दिले नाही वा अंतर भासू दिले नाही. मित्रप्रेमासाठी सुदामनगरी बनवली तर राधेवरील मित्रप्रेमासाठी वृंदावन,

दुर्योधनाचे म्हणण्यानुसार ते सत्यावर असत्याचं युद्ध लादू पाहात आहेत,हे माहीत असूनही दुर्योधनाला सैन्याची केलेली मदत........ राग मनात असूनही संयम बाळगत रागावर नियंत्रण कसं ठेवावं हे ही कृष्ण शिकवतो नव्हे तर कृष्णाला द्रौपदीचा झालेला व कौरवांनी भर दरबारात अधर्म बाळगलेल्याचा दाखला मनात ठेवून या कृष्णाने या अधर्माचा नाश करण्यासाठी असत्याचाही आधार घेतला,नव्हे तर एक तत्व मांडलं की सत्य बाहेर आणण्यासाठी बोललेलं असत्य हे असत्य नसतं.आजही न्यायालयात अशाच प्रकारचे खटले चालतात.खटले निकाली काढतांना त्या खटल्यात पुरावे तपासले जातात. काही मानवसदृश पुरावे असत्यही बोलतात.त्यात चांगल्या माणसांचे बळी जातात.पण एकही वाईट माणूस मात्र त्यातून सुटत नाही.महाभारतातील युद्धात पितामहा भीष्म,द्रोण,कर्ण,कृपाचार्य हे वीर योद्धे असून त्यांना कोणीही हरवू शकणार नव्हते. अशावेळी त्यांच्या कमजोरीचा फायदा घेवून जे काही करायला पांडवांना कृष्णाने बाध्य केलं.तो कृष्णाने केलेला अधर्म असला तरी त्याला अधर्म न मानून केलेलं कृत्य कृष्णलीलेचाच एक भाग आहे.प्रेमाच्या बाबतीत विचार केल्यास प्रेम करा पण त्या प्रेमात वासना नको तर मदत करण्याची वृत्ती जणू कृष्ण राधेचे प्रेम आणि राधेसाठी उत्पन्न केलेलं वृंदावन.

कृष्णलीलेची उदाहरणं भरपूर आहेत. द्रौपदीला साडी पुरविणारा क्रिष्ण अर्थात बहिणीची मदत करणारा भाऊराया या कृष्णने साकारला आहे,नव्हे तर शत्रूलाही मित्र मानणारा कृष्ण हा काही एखाद्या देवदूतापेक्षा लहान नाही.कृष्ण हा माणुसच होता आपल्यासारखा.पण त्याच्या वेगवेगळ्या लीलांनी तो देवच वाटतो.कृष्णाचे बालपण असो की कृष्णाचे तरुणपण असो,कृष्णाने वेळप्रसंगी आपल्या लीला दाखवल्या.आजही त्या लीला आपल्या उपयोगात येतात.कृष्णाच्या बासुरीने मंत्रमुग्ध होणारी जनावरं.कला जोपासा पण ती मनापासून जोपासा.त्यात चालढकलपणा नको हेही कृष्ण शिकवून जातो.नव्हे तर आपल्या गोकुळातले दही दूध मथुरेला जावू नये.ते आपल्या गोकुळच्या लोकांना मिळावे म्हणून ते माठ फोडणारा कृष्ण संदेश देतो की आपल्या देशाचा माल देशातच विका.देशातीलच स्वदेशी बनावटीच्या वस्तू वापरा.विदेशी लोकांच्या वस्तू वापरू नका.आज चीनचा माल भारतात येत आहे. त्याचबरोबर घातक रसायनेही भारतात येत आहे. काल जेव्हा दुष्काळ पडला होता.तेव्हा गाजर गवत लालगुंजीच्या आयातीतून देन म्हणून भारताला मिळाली.आज घातक बिमा-या.गाजरगवत पीकांचा शत्रू...... पीक होवू देत नाही.तर आज चीनचे मोबाईल माणसांचे शत्रू. डोळ्यापासून तर डोक्यापर्यंतचे आजार.काल व्यापार लादण्यासाठी इंग्रज आले.दिडशे वर्ष राज्य करुन गेले.आज चीन येतोय..खरंच कृष्णलीला ही तमाम भारतीयांनो सावध व्हा असा संदेश देते. पण त्या गोष्टी आपण समजून घेण्याची गरज आहे. अन्यथा भारताचं सार्वभौमत्व धोक्यात येवू शकते.

कृष्ण जरी दह्यांचं चौर्य कर्म करीत असला तरी ते चौर्यकर्म नव्हतं.तुटपुंजे पैसे कमविण्यासाठी आपल्या लहानग्या बाळालाही ज्या महिला दही वा लोणी देत नव्हत्या.ते लोणी बाळाला देण्यासाठी या महिलांनी बाध्य व्हावं यासाठी ते चौर्य कर्म होतं.

खरंच कृष्ण लीलेत वास्तविकता आहे.आपण आजही कृष्ण दृष्टीकोन अंगीकारावा असाच आहे. आजची पिढी मात्र कृष्ण लीला मानत नाही.सर्रास गुन्हे करीत आहेत.कोणावर बलात्कार करीत आहे.केवळ शरीराचाच बलात्कार नाही तर मानसिकही बलात्कार करीत आहेत.बोलण्यातूनही चांगल्या माणसांची मनं दुखावत आहे.राजगादी साठी भांडणं होतात आहे.राजनेते कार्यकर्त्यांची लढाई जुंपवत आहेत.स्वतः मात्र टाळूवरचे लोणी खात आहेत.कृष्णाने राजगादी पाहिली नाही.कंस वधानंतर त्यांना हवं तर मथुरेची गादी भेटत होती. पण त्या कृष्णाने ती नाकारली व स्वतः आपले आजोबा उदयभानाला राजगादीवर बसवले.अर्थात राजगादीचा लोभ करु नका हाही संदेश कृष्णा ने दिलेला आहे.

कृष्णाने आपल्याला आजच्या जगात जगण्यास्तव ब-याच गोष्टी सांगितल्या.आपण कितपत त्या गोष्टीचा उपभोग घेतो हे आपल्यावरच अवलंबून आहे.तेव्हा तो निर्णय आपला आहे.एक मात्र नक्कीच की कृष्णलीलेत जीवन जगण्याचे सार दडले आहे.ते आपण नक्कीच शोधावे एवढंच शेवटी म्हणावेसे वाटते.




### भाजपाच्या वतीने

## जिल्हा परिषद शाळेत राष्ट्रध्वजाचं वितरण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निदर्शना नुसार देशात हर घर तिरंगा मोहीम दरवर्षी प्रमाणे राबविण्यात येते. या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भारतीय जनता पार्टी कल्याण ग्रामीण चिटणीस संदीप क्षीरसागर व कल्याण ग्रामीण महिला उपाध्यक्ष सोनी क्षीरसागर यांच्या माध्यमातून पिसवली जिल्हा परिषद शाळा व अडवली जिल्हा परिषद शाळा मधील लहान मुलांना खाऊ व झेंडे वाटप करण्यात आले. यावेळी कल्याण ग्रामीणचे अध्यक्ष आतिश चौधरी, महिला कल्याण ग्रामीण अध्यक्ष प्रगती भोईर, कल्याण ग्रामीण कोषाध्यक्ष नीलम भोईर, युवा मोर्चा अध्यक्ष विकी पारदे व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी लहान मुलांना झेंडे व खाऊ वाटप करण्यात आले आणि भारत माता की जय वंदे मातरम च्या घोषणा देण्यात आल्या. तसेच अडवली परिसरातील सोसायटी व दुकानान मध्ये झेंडे वाटप करण्यात आले. संदीप क्षीरसागर व सोनी क्षीरसागर यांच्या माध्यमातून अडीवली पिसवली मध्ये असे अनेक उपक्रम राबवण्यात येतात त्याबद्दल नागरिकांनी त्यांचे आभार मानत शुभेच्छा दिल्या.

### कल्याण डोंबिवलीत

## ५० सार्वजनिक तर २७५ खाजगी दहीहंडी उत्सवांचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : यावर्षी कल्याण पोलीस उपायुक्त परिमंडळ ३ कल्याण मध्ये एकूण सार्वजनिक ५० व खाजगी २७५ दहीहंडी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. तसेच मानाच्या दहीहंडी ११ असून, कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता परिमंडळ ३ कल्याण मध्ये डीसीपी १, एसीपी २, पीआय २२ एपीआय/पीएसआय ७१, पोलीस कर्मचारी ४७६, महिला पोलीस कर्मचारी १२६ आणि एसआरपीएफ प्लाटून १ असा बंदोबस्त लावण्यात येणार आहे.



दि.१० ऑगस्ट २०२५ रोजी ठाणे येते झालेल्या १५ व्या SKSA राष्ट्रीय कराटे चॅम्पियन शिप मध्ये उत्तम कामगिरी केल्याबद्दल जीवनदीप शैक्षणिक संस्थेच्या संस्थापिका मा.स्मिता घोडविंदे मॅडम यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांचा व त्यांचे गुरु गगन दत्ता सपकाळ यांचा सत्कार करण्यात आला या सत्कार समारंभा प्रसंगी श्री .प्रशांत घोडविंदे सर, प्रतीक्षा घोडविंदे मॅडम यांनी सुद्धा मुलांना योग्य मार्गदर्शन केले व त्यांचे अभिनंदन केलं.

## मुंबईत १८ ऑगस्ट रोजी 'जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महिलांना आपले प्रश्न व तक्रारी मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा यासाठी महिला व बाल विकास विभागाच्यावतीने 'महिला लोकशाही दिन' जिल्हास्तरावर साजरा केला जातो. यंदा हा उपक्रम १८ ऑगस्ट २०२५ रोजी, सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे होणार असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी दिली आहे.

या दिवशी समस्याग्रस्त व पीडित महिलांना शासकीय यंत्रणेकडून तक्रारींचे निवारण करण्यासाठी सुलभ मार्गदर्शन व साहाय्य मिळणार आहे. इच्छुकांनी तक्रार अर्ज विहित नमुन्यात भरून, आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, ११७ बी.बी.डी. चाळ, पहिला मजला, वरळी, मुंबई ४०००१८ येथे सादर करावेत.

# कल्याण व भिवंडी तालुक्यात कर्करोग तपासणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ठाणे जिल्ह्यातील नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने जागरूक करण्यासाठी आणि प्राथमिक टप्प्यावर गंभीर आजाराचे निदान करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने३१ऑगस्ट२०२५ पर्यंत कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. यातील कल्याण आणि भिंवडी तालुक्यातील सुमारे२हजार४४३ नागरिकांची तपासणी करण्यात आली, यामध्ये जवळपास३२ संशयित रुग्णांची नोंद करण्यात आली असलीतरी यामध्ये तालुका पातळीवर आरोग्य अधिकां-यानी याकडे पाठ फिरवल्याने नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. तर अशा अधिका-यावर कडक कारवाई करण्याचा इशारा ठाणे सिव्हिल हॉस्पिटलचे डॉ कैलास पवार यांनी दिलाआहे. कॅन्सर अर्थात कर्करोग या गंभीर आजाराचे निदान व उपचार करून त्यावर मात करता येते. यासाठी जिल्हाधिकारी ठाणे व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा शल्यचिकित्सक डॉ कैलास पवार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ परगे यांच्या देखरेखीखाली कल्याण आणि भिंवडी तालुक्यात कॅन्सर मोबाईल व्हॅन चा दौरा आयोजित करण्यात आला होता, यामध्ये जिल्ह्यावरुन काही वैद्यकीय अधिकां-याची नियुक्ती करण्यात आली होती तर तालुक्यातील सर्व शिबीरांचे पर्यवेक्षण व सनियंत्रण करण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधीक्षक यांच्या वर होती, परंतु त्यांनी ती पार पाडली नाही,

यातील भिवंडी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ नलिनी ठोंबरे यांनी त्यांच्या कॅम्पमधील सर्व मोबाईल व्हॅन दौऱ्यांना भेटी दिल्या, मात्र कल्याण मध्ये असे झाले नाही, निळजे येथील



मोबाईल व्हॅनला जिल्ह्याच्या स्मिता अडे मॅडम व अंकिता जोशी मॅडम यांनी व्हिजिट केल्या, चिंचवली खडवली येथे डॉ मृणाली राहूड यांनी भेट दिली, परंतु निळजे, खडवली आणि खोणी येथे ना तालुका वैद्यकीय अधिकारी, ना त्यांचे कोणी प्रतिनिधी फिरकले नाही, त्यामुळे कर्मचाऱ्यांसह नागरिकांमध्ये संताप निर्माण झाला होता,

तरीही या दोन तालुक्यात तब्बल२४४३ नागरिकांची तपासणी करून यामध्ये ३२ संशयित रुग्णांची नोंद करण्यात आली आहे,यामध्ये मुख कर्करोग: ८स्तन कर्करोग: १,गर्भाशय मुख कर्करोग: १८इतर कर्करोग: ५ चा समावेश आहे. आधुनिक उपकरणांनी सज्ज कर्करोग तपासणी मोबाईल व्हॅनमुळे नागरिकांना त्यांच्या परिसरात च मोफत, सुलभ, आणि जलद तपासणीची सुविधा मिळत आहे. जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ, व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यासाठी मार्गदर्शन करत आहेत, परंतु अशा बेजबाबदार व कामचुकार तालुका आरोग्य अधिकां-यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरत आहे, त्यामुळे अशा अधिका-यांवर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ कैलास पवार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ गंगाधर परगे काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दैनिक जीवनदीप वार्ता
ठाणे ■ शुक्रवार
■ १५ ऑगस्ट २०२५
jeevandeepvartanews2020@gmail.com



# तांत्रिक कारणास्तव नोंदणी विभागाचे कामकाज तीन दिवस बंद राहणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे - राज्यातील नोंदणी विभागाच्या आय-सरीता या प्रणालीच्या तांत्रिक देखभाल आणि दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे. या कामामुळे विभागाचे कामकाज बंद राहणार असल्याने पुढील तीन दिवस राज्यात घरांच्या खरेदी-विक्री, भाडेकरार तसेच इतर दस्त नोंदणीची कामे तीन दिवस बंद राहणार आहेत.

राज्यातील नोंदणी विभाग सलग तीन दिवस बंद राहणार असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे राज्यातील सर्व दस्त नोंदणी आणि त्यासंबंधित सेवेतील काम थांबणार आहे. ही सेवा १४ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२ वाजल्यापासून बंद होणार असून थेट १७ ऑगस्ट मध्यरात्री १२ वाजता सुरु होणार आहे. नोंदणी विभाग हा जिल्हा प्रशासनातील एक महत्त्वाचा घटक आहे. जमिनीचे, घरांचे आणि इतर स्थावर मालमत्तांचे व्यवहार कायदेशीर करण्यासाठी त्याची नोंदणी आवश्यक असते. व्यवहाराची नोंदणी ही केवळ कायदेशीर पुरावा नसून, मालमत्तेवर मालकी हक्क स्थापित

करण्याचा अधिकृत दस्तऐवज असतो. परंतु, आता तीन दिवस नोंदणी विभाग बंद राहणार असल्यामुळे सर्व व्यवहार ठप्प होणार आहेत. नोंदणी विभागाच्या आय-सरीता (i-Sarita) प्रणालीतील सर्व्हरचे तांत्रिक देखभाल आणि दुरुस्तीची काम हाती घेण्यात येत आहे. त्यामुळे नोंदणी विभाग तीन दिवस बंद राहणार असून त्याअंतर्गत होणाऱ्या सर्व सेवांचे काम थांबणार आहे. या सेवा १४ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२ वाजल्यापासून बंद होणार आहे. तर, १७ ऑगस्ट मध्यरात्री १२ वाजता सुरु होणार आहे. त्यामुळे संबंधित पक्षकार आणि दस्त नोंदणी करणारे व्यावसायिक यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणेचे उदयराज चव्हाण यांनी केले आहे.

# मतदार नोंदणीत दुबार नाव नोंदणी होणार नाही याची दक्षता घ्या



## जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांचे जिल्ह्यातील बीएलओ यांना निर्देश

सर्वच बीएलओ यांना त्यांच्या कडे असणाऱ्या मतदार यादी भागाची काटेकोर पडताळणी करून आवश्यक तेनुसार दुबार मतदारांचे फॉर्म क्रमांक - ७ भरून घेण्याच्या व त्यावर नियमानुसार कारवाई करण्याच्या तसेच मतदार यादीच्या आगामी काळात होणाऱ्या पुनरिक्षण कार्यक्रमात देखील अशाच पद्धतीने दुबार नावे वगळण्यासाठी काटेकोर तपासणी व कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व निवडणूक यंत्रणेला दिल्या आहेत.

■ इंदूराणी जाखड - जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी पालघर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** मतदार यादीत दुबार असणारी नाव वगळण्यासाठी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी लक्षपूर्वक कारवाई करावी तसेच नव्याने मतदार नोंदणी होताना दुबार नावाची नोंदणी होऊ नये यासाठी दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी दिल्या आहेत. निवडणूक कामांमध्ये कसूर करणाऱ्या विरुद्ध कारवाई करण्याबाबतच्या सूचना त्यांनी विधानसभेच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांना दिल्या आहेत.

नालासोपारा विधानसभा क्षेत्रात एका महिलेचे एकापेक्षा अधिक ठिकाणी नाव नोंदले गेल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी या प्रकरणात चौकशी करून या महिलेची सर्व दुबार नावे रद्दरद्द करण्यात आली आहेत. १३२-नालासोपारा मतदारसंघात सुषमा गुप्ता यांनी जानेवारी २०२४ च्या सुमारास मतदार यादीत नाव नोंदवण्याच्या दृष्टीने नाव नोंदणीचा फॉर्म क्रमांक - ६ ऑनलाइन पद्धतीने दाखल केला होता. ऑनलाइन फॉर्म भरल्यानंतर त्वरित मतदार कार्ड मिळेल असा त्यांचा समज होता. तथापि, हा अर्ज केल्यानंतर एपिक कार्ड त्वरित न मिळाल्याने त्यांनी पुन्हा नव्याने ऑनलाइन पद्धतीने मतदार नोंदणीचा फॉर्म क्रमांक-६ एकूण सहा वेळा भरल्याची माहिती जिल्हा निवडणूक विभागाकडून देण्यात आली आहे. ही चूक लक्षात आल्यानंतर त्यांनी भरलेल्या सहा अजर्जापैकी एक नोंद कायम ठेवून इतर पाच नावाच्या नोंदी वगळण्यासाठी फॉर्म क्रमांक-७ भरून घेण्यात आला आहे असे निवडणूक विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

ही बाब निदर्शनास आल्यानंतर संबंधित मतदान केंद्रस्तरीय यंत्रणेला या तसेच इतर कोणत्याही मतदाराकडून दुबार मतदान होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्ह्यातील सर्व बीएलओ यांना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील इतर ठिकाणी देखील दुबार मतदार शोधण्याचे काम हाती घेण्यात आले असून दुबार नाव असणाऱ्या मतदारांनी नमुना अर्ज ७ भरून आपले मतदार यादीत नाव एकाच ठिकाणी ठेवण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक विभागातर्फे करण्यात आले आहे. सर्वच बीएलओ यांना त्यांच्या कडे असणाऱ्या मतदार यादी भागाची काटेकोर पडताळणी करून आवश्यक तेनुसार दुबार मतदारांचे फॉर्म क्रमांक - ७ भरून घेण्याच्या व त्यावर नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मतदार यादीच्या आगामी काळात होणाऱ्या पुनरिक्षण कार्यक्रमात देखील अशाच पद्धतीने दुबार नावे वगळण्यासाठी काटेकोर तपासणी व कार्यवाही करण्याच्या सूचना देखील जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी पालघर यांनी सर्व निवडणूक यंत्रणेला दिल्या आहेत.

# आशीष शेलार यांची चित्रपटसृष्टी विकास व सांस्कृतिक विषयांवर सकारात्मक चर्चा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**मुंबई, ता. १४** सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार यांनी राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभागाच्या शिष्टमंडळासोबत बैठकीत विविध प्रलंबित विषयांवर सकारात्मक चर्चा केली. बैठकीत महाराष्ट्रातील बंद पडत चाललेल्या एक पडदा (सिंगल स्क्रीन) चित्रपटगृहांच्या समस्या, नाट्यगृहांमध्ये नाटकांचे प्रयोग वगळून मराठी चित्रपट दाखविण्याचे धोरण ठरवण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.


त्याचबरोबर, विठाबाई नारायणगावकर यांच्या नावाने आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव तयार करून सादर करण्याचे निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले. नाशिक येथील २००८ पासून प्रलंबित असलेली १२७एकर गायरान जमीन मुंडेगाव, तालुका इगतपुरी येथे नाशिक फिल्म सिटीसाठी उपलब्ध करून देण्याबाबत आणि दादासाहेब फाळके स्मारक उभारणी व राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय महोत्सवात निवडलेल्या मराठी चित्रपटांना थेट अ-वर्ग मान्यता देण्यासंबंधीही चर्चा झाली. शेलार यांनी हे सर्व विषय पुढील दोन महिन्यांत मार्गी लावण्याचे आणि त्यानंतर पुढील आढावा बैठक घेण्याचे आश्वासन दिले. बैठकीस फिल्म सिटीच्या स्वाती म्हसे पाटील, दुसरे संचालक विभीषण चौरे, राष्ट्रवादी चित्रपट सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील, प्रदेश उपाध्यक्ष नितीन धवणे, सिंगल थिएटर असोसिएशनचे अध्यक्ष नितीन दातार, तमाशा परिषदेचे अध्यक्ष मोहित नारायणगावकर, संभाजी जाधव, मराठी डिस्ट्रीब्यूटर चंद्रकांत विसपुते, दिग्दर्शक शिरीष राणे आदी मान्यवर उपस्थित होते.


# राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सचिवपदी रवींद्र परटोले
## ठाणे ग्रामीण जिल्ह्यातून नवनेतृत्वाला संधी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**शहापूर :** शहापूर तालुक्यातील अंबर्जे गावचे भूमिपुत्र व सामाजिक कार्यकर्ते,युवा नेते म्हणून परिचित असलेले रवींद्र कृष्णा परटोले यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या शुभहस्ते रवींद्र परटोले यांना सचिव पदाचे नियुक्तीपत्र देण्यात आले असून ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील नव नेतृत्वाला प्रदेश सचिव पदाची संधी दिल्याबद्दल सर्वत्र रवींद्र परटोले यांचे कौतुक होत आहे. रवींद्र परटोले हे यापूर्वी काँग्रेस पक्षात काम करत होते काँग्रेस पक्षात असताना त्यांनी प्रदेश ओबीसी विभागाचे कार्यालयीन सरचिटणीस म्हणून काम केले होते, प्रांतिक सदस्यपदी ते शहापूर ब्लॉकमधून निवडून गेले होते तसेच ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस म्हणून ते कार्यरत होते. विधानसभा निवडणुकीच्या नंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यांनी आतापर्यंत केलेल्या राजकीय कामाचा अनुभव लक्षात घेता, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे, आ. दौलत दरोडा, ठाणे ग्रामीण जिल्हा अध्यक्ष भरतभाऊ गोंधळे यांच्या शिफारसीनुसार नव नेतृत्वाला संधी देण्यासाठी त्यांची प्रदेश सचिव या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.




*जावक क्रमांक : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय/ विभागीय माहिती कार्यालय कोकण/विमाका/कोवि/स्वा.दिन/3371 दिनांक :- 14 ऑगस्ट, 2025

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024